MHBI100012202006

<u>नियमीत दिवाणी दावा क्रमांक १८४/२००६ मधील निशाणी क्र. १५४ वरील आदेश</u>

[०१] प्रस्तुतचा अर्ज वादीनीं त्यांच्याविरुध्द दि. २२.०७.२०२४ रोजी निशाणी क्र. १ वर पारित करण्यात आलेला पुरावा वगळलेबतचा (evidence discard) आदेश रद्द करुन त्यांना पुरावा घेण्याची परवानगी देण्याच्या विनंतीसह सादर केलेला आहे.

[०२] प्रतिवादी क्र.१ तर्फे विद्वान वकिलांनी अर्जाच्या पाठीमागील पानावर म्हणणे सादर करत, अर्जास विरोध करत नामंजुर करण्याची मागणी केली आहे.

[०३] अर्जाचे, त्यावरील म्हणण्याचे आणि अभिलेखाचे अवलोकन केले.

[०४] दोन्ही बाजुच्या विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

[०५] प्रस्तुतचा दावा हा वादींनी वाटणी करुन वेगळा ताबा मिळणेबाबत दाखल केलेला आहे. प्रस्तुतच्या दाव्यात दोन्ही पक्षकारांचे स्थावर मिळकतीसंदर्भात हक्क व अधिकार विवादीत करण्यात आलेले आहेत. यात काही एक शंका नाही की, वादींना वारंवार संधी दिल्यानंतर देखील ते उलटतपासासाठी हजर न झाल्याने त्यांच्याविरुध्द दिनांक २२/०७/२०२४ रोजी निशाणी क्र. १४७ वरील पुरावा वगळलेबतचा (evidence discard) असा आदेश पारित करण्यात आला आहे व निशाणी क्र. १ वर आदेशान्वये वादीचा पुरावा बंद करण्यात आला. एकुणच दाव्यात विवादीत केलेले तथ्य विचारात घेता, वादींने नि.क्र.१४७ येथे दिलेला त्यांचा पुरावा दाखल करुन घेण्याची संधी वादीला देणे न्यायोचित होईल. वादींनी त्यांचा पुरावा नोंदवण्यास केलेला विलंब त्यांच्यावर योग्य तो खर्च लादुन माफ करता येईल. एकुणच वर नमुद कारणांचा

विचार करता, खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

(१) निशाणी क्रमांक १५४ वरील अर्ज रक्कम रुपये १०००/– खर्च प्रतिवादी क्र. १ ला देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

(२) वादींविरुध्द पारीत करण्यात आलेला पुरावा वगळलेबतचा व पुरावा बंदचा आदेश रद्द करण्यात येत आहे.

(३) प्रस्तुतच्या अर्जाचा खर्च वादीनीं सोसावा.

सही/–
(प्रविण वि. पाटील)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
केज.

दिनांकः– ०४.०९.२०२४.

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/ order.

| | |
|---|---|
| Dictated on | : 04/09/2024 |
| Transcribed on | : 04/09/2024 |
| Checked & signed on | : 04/09/2024 |

Sd/-

(S.Y. Gore),
Stenographer Grade-3,
Ct. of CJJD and JMFC, Kaij.